दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 14 एप्रिल 2026 | अंक क्र. 324 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 135 व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !**



# स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे प्रणेते ; शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा संदेश दिला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्यप्रदेश येथील महू येथे झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे युरोपात जाऊन शिक्षण घेणारे पहिले भारतीय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बॅरिस्टर, डॉक्टर अशा मानाच्या पदव्या त्या काळात मिळाल्या. त्यांनी संपूर्ण देशासाठी काम केले आणि त्यांना डॉ. बाबासाहेब म्हणून ओळखले जाते. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे केवळ एक नाव नसून ते प्रचंड चिकाटी, अथांग ज्ञान आणि अढळ ध्येयवादाचे प्रतीक आहेत. एक अग्रगण्य समाजसुधारक, कायदेपंडित, अर्थशास्त्रज्ञ, लेखक आणि बहुभाषिक वक्ते म्हणून त्यांनी मानवी कर्तृत्वाची नवीन क्षितिजे विस्तारली. भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून त्यांनी आधुनिक राष्ट्राचा पाया रचला.





## 1947

मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यांनतर नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात बाबासाहेबांची कायदा आणि न्याय मंत्री म्हणून नियुक्ती झाली. 1951 मध्ये मात्र त्यांनी काश्मीर प्रश्न, भारताचे परराष्ट्र धोरण आणि हिंदू कोड बिल याबाबत नेहरूंच्या धोरणावरून मतभेद व्यक्त करत आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

नेपाळ येथील काठमांडू इथे 1954 मध्ये झालेल्या "जागतिक बौद्ध धर्म परिषदेत", बौद्ध भिक्खूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ते ह्यात असताना "बोधिसत्व" ही पदवी प्रदान केली होती





### सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

■ ज्या काळात भारतीय समाज पूर्वग्रह आणि जातीय विषमतेच्या विळख्यात अडकलेला होता, त्या काळात बाबासाहेबांनी विषमतेच्या भिंतींना धैर्याने धडक दिली. कोट्यवधी शोषित-वंचितांच्या जीवनातील अंधकार दूर करण्यासाठी ते एक 'अविचल योद्धा' म्हणून उभे राहिले.

### 'बोधिसत्त्व' बाबासाहेब

■ त्यांनी समाजातील वंचित घटकांसाठी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी दलित, शोषित, पीडित लोकांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या विचारांमुळे समाजात परिवर्तन झाले. त्यांनी शिक्षण, समानता, बंधुता यांचा प्रसार केला.

### 'दी प्रॉब्लेम ऑफ रुपी'

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र विषयात मोठे संशोधन केले. त्यांनी 1923 साली "The Problem of the Rupee" हे पुस्तक लिहिले. त्यांच्या या पुस्तकामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला दिशा मिळाली.

### डॉ. बाबासाहे आंबेडकरांचे कार्य

■ त्यांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. त्यांनी कामगार, महिला, शेतकरी यांच्यासाठी अनेक कायदे केले. सामाजिक न्यायासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.

### डॉ. बाबासाहे आंबेडकरांचे ऐतिहासिक राष्ट्रनिर्माण

■ डॉ. बाबासाहे आंबेडकर यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्यांनी समाजातील सर्व घटकांना समान हक्क मिळवून देण्यासाठी कार्य केले. त्यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या विचारांचा प्रभाव भारतासह संपूर्ण जगावर झाला. त्यांच्या कार्यामुळे समाजात समानता, बंधुता आणि न्याय यांची स्थापना झाली.

### सामाजिक क्रांतीचे साधन: ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांचे मत

■ प्रसिद्ध संविधान तज्ज्ञ ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी डॉ. आंबेडकरांच्या या कार्याचे वर्णन 'क्रांतिकारक' असे केले आहे. ऑस्टिन यांच्या मते: "भारतीय संविधानातील बहुतांश तरतुदी या थेट सामाजिक क्रांतीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी किंवा त्या क्रांतीसाठी आवश्यक पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 3 एप्रिल 1927 रोजी नवीन सुधारणांच्या संदर्भात पीडित- शोषित वर्गाच्या समस्यांमागची कारणे शोधून त्यांचे निराकरण करण्यासाठी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरू केले. भारतात पार पडलेल्या गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेत 1942 मध्ये त्यांनी कामगार सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. 1946 मध्ये ते बंगालमधून संविधान सभेवर निवडून आले. त्याच वेळी त्यांनी 'शुद्र कोण होते ? (Who were Shudras ?)' हे आपले पुस्तक प्रकाशित केले.

## संपादकीय

# पुन्हा चंद्रमाच्या दिशेने

५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे. फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'फ्रूड फ्लाय-बाय' मोहीम आहे.

याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे.

अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लॉचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल.

अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले. कारण चीन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ स्पर्धेला नवा आयाम या आर्टेमिस मोहिमेने दिला आहे. चंद्रीय अवकाशात या मोहिमेने नव्या स्पर्धेला तोंड फुटले आहे आणि अमेरिका आणि चीन यांच्यात तांत्रिक वर्चस्वासाठी जबरदस्त लढाई आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भू-राजकीय वर्चस्वासाठीही हे युद्ध आहे. या दृष्टीनेच नासाच्या या मोहिमेकडे पाहिले पाहिजे. चंद्राचा दक्षिण ध्रुव हा या स्पर्धेचे मैदान बनला आहे आणि दोन्ही राष्ट्रे संभाव्य पाण्याच्या स्पर्धेसाठी आणि स्त्रोतांसाठी त्यात उतरली आहे. अमेरिकेने या दिशेने सुरुवात केली आहे, तर चीन २०२८-२९ मध्ये चंद्रावर उतरून आपली मोहीम पार पाडणार आहे. आर्टेमिसचे महत्त्व हे आहे, की त्यातून जास्त सुपिरियर मानवी उड्डाण क्षमता कुणाची आहे हे सिद्ध करणार आहे. त्यामुळे अंतराळात आपले प्रथम स्थान निर्माण करून त्यावर राहणे हेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.

अमेरिकेची मोहीम ही युरोप, कॅनडा आणि जपान यांच्या अंतराळ संशोधकांची मिळून बनलेली व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तर चीनची स्वतंत्र आहे.अर्थात चीनचा भागीदार रशिया आहे. आर्टेमिस यशस्वी परत आल्याने अमेरिकेचे वर्चस्व सिद्ध झाल्याने चीन या स्पर्धेत काहीसा मागे पडणार आहे. ही अंतराळ स्पर्धा केवळ द्विपक्षीय नाही, तर भारतासारख्या देशांनीही आपली ताकद अंतराळ वर्चस्वात दाखवून दिली आहे.

भारताने चंद्रीय प्रदेशात आपले वर्चस्व दाखवून केवळ हे दोन देशांतील युद्ध नाही, तर बहुदेशीय आहे, हे सिद्ध केले. आर्टेमिस हे अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण अंतराळ संशोधनात अमेरिका यातूनच आपले पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त करू शकते. चीनच्या प्रगत क्षमतांच्या संदर्भात अमेरिकेला आपली ताकद या मोहिमेद्वारे दाखवून देता येईल. आर्टेमिस ही दहा दिवसांची मोहीम असून त्यातून अमेरिका पुन्हा एकदा आपले चंद्रिय अवकाशात वर्चस्व सिद्ध करेल, तर चीनला त्याची मोहीम आणखी जोरकस करण्यासाठी प्रेरित करेल. अमेरिका आणि चीन यांच्यात आता नव्याने चंद्रासाठी स्पर्धा तयार झाली आहे आणि त्यात वर्चस्व कोण गाजवते यावर अंतराळ स्पर्धेचे भवितव्य ठरणार आहे. १९६१ मध्ये युरी गागारिन हा पहिला अंतराळ वीर ठरला होता. त्यानंतर अमेरिकेची चांद्रमोहीम झाली आणि त्यानंतर आता पुन्हा आर्टिमिस ही मोहीम पार पाडली.

# विनायकराव शिंदेंचे संचालकपद अपात्र करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा जाहीर निषेध

## जिल्हा शिक्षक संघाच्या बैठकीत निषेधाचा ठराव

■ शिराळा/ प्रतिनिधी

शिक्षक संघाचे राज्याचे नेते संभाजीराव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, सांगली जिल्ह्यात शिक्षक संघाच्या माध्यमातून शिक्षकांचे संघटन मजबूत करणाऱ्या विनायकराव शिंदे यांचे शिक्षक बँकेतील संचालक पद अपात्र करणाऱ्या सत्ताधारी संचालकांचा जाहीर निषेध, शिक्षक संघाच्या जिल्ह्याच्या बैठकीत करण्यात आला. विनायकरावांनाअपात्र करण्याची संचालकांना एवढी घाई का झाली आहे, असा सवाल यावेळी जिल्ह्यातून आलेल्या शिक्षक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

विनायकरावांनी२०२२ ला शिक्षक बँकेतील सत्ताधाऱ्यांना पायउतार करण्यासाठी १२ संघटनांची मोट बांधली. शिक्षक बँकेची निवडणूक स्वाभिमानी प्राथमिक शिक्षक मंडळाने लढवली. विनायकरावांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून २१ पैकी २० संचालकांना सभासदांनी निवडून दिले. निवडणुकीत सभासदांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्यासाठी बँकेच्या पहिल्याच मिटिंगमध्ये एक अंकी व्याजदराचा ठराव करून सभासदांना मोठा आर्थिक दिलासा दिला. बँकेचा राजीनामा दिलेल्या सभासदांना परत सभासद करण्यासाठीचा ठराव संमत करण्यात आला. मृत संजीवनी ३० लाखापर्यंत नेण्यात आली. जिल्ह्याला भूषण ठरावी अशी सर्व सोयींनी युक्त, सुसज्ज अशी बँकेची भव्य दिव्य इमारत उभी केली. उमदी, पंढरपूर या दोन नवीन शाखा सुरू केल्या. या सर्व गोष्टीमुळे विनायकरावांची लोकप्रियता जिल्हाभर अधिक

### विनायकरावांची संचालक पदाची हॅट्रिक !



■ विनायकराव शिंदे सलग तीन वेळा सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेवर संचालक म्हणून प्रचंड मतांनी निवडून आले आहेत.२०१०,२०१५ आणि २०२२ ला निवडून येत त्यांनी हॅट्रिक केली. सलग १७ वर्षे ते शिक्षक बँकेचे संचालक राहिले. ज्ञ२०२२ ला त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या निवडणुकीत २१ पैकी २० संचालक निवडून आले. आणि एकमताने त्यांची बँकेचे चेअरमन म्हणून निवड करण्यात आली. तीन वर्षे ते बँकेचे चेअरमन राहिले. बँकेच्या इतिहासात १७ वर्षे संचालक आणि तीन वर्षे चेअरमन असणारे विनायकराव एकमेव आहेत.

वाढू लागली. परंतु पार्टीतील आपमतलबी आणि संधीसाधू लोकांना हे रुचले नाही. विनायकरावांच्या नेतृत्वाखाली निवडून आलेल्या संचालक मंडळातील काही संचालकांना त्यांच्या स्वतःच्या तालुक्यात मते कमी पडली आहेत. पात्रता नसतानाही विनायकरावांचे नेतृत्व आणि स्वाभिमानी शिक्षक मंडळाची ताकद यामुळे ते संचालक उच्चांकी मतांनी निवडून आले. आणि तेच संचालक आज विनायकरावांचे संचालक पद रद्द करण्यासाठी धडपडत आहेत. विनायकरावांची मानहानी करण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि म्हणूनच यावेळी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने त्याचा जाहीर निषेध करण्यात आला.

महाराष्ट्रात अनेक संस्थांमध्ये, अनेक संचालक आजही १० वर्षपेक्षा अधिक कालावधी झालेले कार्यरत आहेत. आरबीआयच्या कायद्यानुसार १० वर्षापेक्षा अधिक कालावधी असणाऱ्या संचालकाचे पद रद्द करण्याचा अधिकार माननीय सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांनाच आहे. संचालक मंडळाला नाही. विद्यमान संचालकाला मुदत संपेपर्यंत अपात्र करता येत नाही. मात्र यानंतरच्या निवडणुकांसाठी त्यांचा अर्ज अपात्र होऊ शकतो.

शिक्षक बँकेच्या सत्ताधारी संचालक मंडळाकडे १० संचालकांचे बळ आहे. विरोधात १० संचालक आहेत. विनायकराव शिंदे यांचे संचालक पद अपात्र करून बँकेतील बहुमत साध्य करून सत्ताधाऱ्यांनी मनमानी कारभाराचा डाव आखला आहे. सभासदाभिमुख, अभ्यासू आणि पारदर्शी नेतृत्वाला बाजुला करून सत्ताधाऱ्यांना काय साध्य करायचे आहे ? सांगली जिल्हा शिक्षक बँकेत सत्ता आणण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या आणि सभासदांना आर्थिक दिलासा देणाऱ्या नेतृत्वाला कायद्याचा आधार घेऊन बाहेर काढणाऱ्या सत्ताधारी संचालक मंडळाला काय साध्य करायचे आहे? विजयाचा गुलाल देणाऱ्या नेतृत्वाला डावलून संचालक मंडळ अघोरी समाधान का मिळवत आहे ? असे अनेक सवाल जिल्ह्यातील तमाम सभासद शिक्षक बांधव करत आहेत. या बैठकीत शिक्षक संघाच्या वतीने या राक्षसी प्रवृत्तीचा जाहीर निषेध करण्यात आला .

यावेळी शिक्षक बँकेचे व्हाईस चेअरमन फत्तु नदाफ, माजी चेअरमन संतोष जगताप, माजी व्हाईस चेअरमन सौ. अनिता काटे, संचालक अजितराव पाटील, शिवाजी जाधव, शरद चव्हाण, शामगोंडा पाटील, गांधी चौगुले, सुधाकर पाटील, संजय काटे, अरुण पाटील, श्रीकांत पवार, महादेव हेगडे, अशोक पाटील, राजाराम कदम, उत्तम पाटील, मोहन माने, नंदकुमार खराडे, दीपक रोकडे, मोहन पवार, वसंत शिंगारे, संजय सावंत, आप्पासाहेब जाधव, सुधीर नलवडे, हणमंत गायकवाड, अजिनाथ बुधावले, विकास वायदंडे, सचिन पाटील, शिवरुद्र वठारे, दिलीप पवार, आसिफ मुजावर, तानाजी कोडग उपस्थित होते.

# लाख मोलाचं देणं: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

देणं' ही संकल्पना व्यवहारात अनेकदा भौतिक तराजूत तोलली जाते. पण जेव्हा हे देणं विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाचे असते, तेव्हा त्याची व्याप्ती काळ आणि अवकाशाच्या पलीकडे जाते. हे देणं केवळ हक्क किंवा अधिकारांचे नाही, तर ते एका मृतवत समाजाला मिळालेला 'प्राणवायू' आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं आयुष्य म्हणजे संघर्षाच्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून निघालेले एक अस्सल कांचन होते, ज्याची प्रभा आज केवळ वंचितांच्याच नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या प्रत्येक स्तंभाला उजळून टाकत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे 'लाख मोलाचे देणं' केवळ एका समाजघटकापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवी संस्कृतीला मिळालेले एक संचित आहे.

■ प्रज्ञेचा सूर्य: शिक्षणाकडून शहाणपणाकडे

■ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं पहिले आणि सर्वात मूलभूत देणं म्हणजे 'विवेकाचे अधिष्ठान'. त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी मिळवण्याचे साधन मानले नाही, तर ती गुलामगिरीच्या बेड्या तोडणारी 'वाघीण' आहे हे सिद्ध केले. ज्या काळात ज्ञानाच्या वाटा काहींसाठी आरक्षित होत्या, त्या काळात त्यांनी जागतिक स्तरावरील सर्वोच्च ज्ञान आत्मसात करून एक 'प्रज्ञासूर्य' म्हणून स्वतःला घडवले. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा त्यांचा त्रिसूत्री संदेश म्हणजे केवळ घोषणा नव्हती; ती एका वैचारिक क्रांतीची पायाभरणी होती. त्यांनी समाजाला केवळ साक्षर केले नाही, तर स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचे 'शहाणपण' दिले. हे अक्षरांचे शस्त्र आजही अज्ञानाच्या अंधाराचा प्रहार करत आहे.

■ भारतीय संविधान- लोकशाहीचा नैतिक कणा:

■ भारताला मिळालेले सर्वात महान देणं म्हणजे 'भारतीय संविधान'. हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून तो कोट्यवधी भारतीयांच्या जगण्याचा 'सांस्कृतिक जाहीरनामा' आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचे पाणी करून एका अशा भारताचे स्वप्न कागदावर उतरवले, जिथे वंचितांना केवळ मतदानाचा अधिकार मिळाला नाही, तर 'सत्तेत वाटा' मिळाला. न्याय, स्वातंत्र्य आणि समता या त्रयींच्या माध्यमातून त्यांनी हजारो वर्षांची उतरंड मोडीत काढली. सामान्य माणसाच्या हातात असलेले मतदानाचे शस्त्र हे राजवाड्याची सत्ता झोपडीपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. हे संविधान म्हणजे आधुनिक भारताचा 'कणा' आहे.

■ धम्मक्रांती: आत्मसन्मानाचे नवे क्षितीज:

■ १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर झालेले धम्मचक्र प्रवर्तन केवळ ऐतिहासिक धर्मबदल नव्हते, तर ते 'माणसाचा माणूस म्हणून झालेलं पुनरुत्थान होतं. शतकानुशतके ज्यांच्या सावलीचा विटाळ मानला गेला, त्यांना बुद्धाच्या करुणेच्या आणि प्रज्ञेच्या प्रकाशात उभे करून बाबासाहेबांनी जागतिक मानवी इतिहासात एक अभूतपूर्व क्रांती घडवली. त्यांनी दिलेला 'धम्म' हा अंधश्रद्धेवर आधारित नसून तो विज्ञानावर आणि मानवी मूल्यांवर आधारित आहे. या धम्मामुळे पिचलेल्या मनांना 'ताठ कणा' मिळाला आणि गुलामीची मानसिकता गळून पडली. हा केवळ आध्यात्मिक मार्ग नव्हता, तर तो एक सामाजिक समतेचा महामार्ग होता.

■ स्त्रीमुक्ती आणि राष्ट्र उभारणीचे व्यापक दृष्टिकोन

■ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ एका वर्गापुरते मर्यादित करणे हा त्यांच्यावर अन्याय ठरेल. त्यांनी 'हिंदू कोड बिल'च्या माध्यमातून भारतीय स्त्रियांना जे अधिकार दिले, ते आजही त्यांच्या प्रगत विचारांची साक्ष देतात. मालमत्तेचा हक्क, घटस्फोटाचा अधिकार आणि सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला. याशिवाय, कामगारांचे कामाचे तास निश्चित करणे, दामोदर खोरे प्रकल्प, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची संकल्पना यांमधून त्यांच्या 'राष्ट्रनिर्मात्या' रूपाची व्यापकता स्पष्ट होते. त्यांनी प्रत्येक श्वासासोबत देशाच्या प्रगतीचा विचार केला.

■ राष्ट्रनिर्माता आणि आर्थिक क्रांतीचे जनक:;

■ डॉ.बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक क्रांतीपुरते मर्यादित नव्हते, तर ते एका आधुनिक राष्ट्राचे 'आर्थिक शिल्पकार' होते. भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेली 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' ही त्यांच्या 'The Problem of the Rupee' या प्रबंधातील विचारांतूनच साकारली. हे त्यांचे देणं देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी लाख मोलाचे ठरले. जलसंधारण, दामोदर खोरे प्रकल्प आणि वीज निर्मितीच्या माध्यमातून त्यांनी देशाच्या औद्योगिक विकासाची पायाभरणी केली. "पाणी आणि वीज ही राष्ट्राची संपत्ती आहे," हा विचार देऊन त्यांनी भविष्यातील समृद्ध भारताचे स्वप्न पाहिले होते. हे देणं आजही भारताच्या प्रगतीच्या धमन्यांमध्ये रक्तासारखे धावत आहे.

■ मजूर आणि श्रमिकांचा सन्मान:-

■ जगातील कामगार चळवळीला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान हे मानवी हक्कांचे एक सुवर्णपान आहे. मजुरांच्या कामाचे तास १२ वरून ८ वर आणणे, महिला कामगारांना प्रसूती रजा (Maternity Benefit) मिळवून देणे आणि विम्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे; हे त्यांचे उपकार कधीही न विसरता येणारे आहेत. त्यांनी मजुरांना केवळ कष्टकरी मानले नाही, तर त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. आज जो कामगार आत्मसन्मानाने आपल्या कामाच्या जागी उभा आहे, त्या प्रत्येक घामाच्या थेंबात बाबासाहेबांच्या संघर्षाचे मोल साठलेले आहे.

■ पत्रकारिता: मुका समाज बोलता करणारा शब्दवेध:-

■ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ कायदे केले नाहीत, तर अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्यासाठी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' यांसारखी वृत्तपत्रे सुरू केली. शब्दांच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या सुप्त जाणीवांना जागे केले. हे त्यांचे पत्रकारितेचे देणं म्हणजे विचारांच्या प्रवासातील एक असा दीपस्तंभ आहे, ज्याने उपेक्षितांना स्वतःचा आवाज मिळवून दिला. पत्रकारिता ही केवळ माहिती देण्याचे साधन नसून ती सामाजिक परिवर्तनाचे 'रणशिंग' आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

■ वैश्विक मानवाचा आदर्श:-

■ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे केवळ भौगोलिक सीमांमध्ये बांधलेले नाहीत. ते कोलंबिया विद्यापीठ असो वा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, जगभरातील विचारवंतांसाठी ते आजही मार्गदर्शक आहेत. त्यांनी दिलेला 'संवैधानिक नैतिकता' (Constitutional Morality) हा विचार आजही जागतिक लोकशाहीसाठी एक आदर्श मानला जातो. जेव्हा एखादा देश आपल्या हक्कांसाठी झगडतो, तेव्हा त्यांना बाबासाहेबांच्या संविधानाचा आधार वाटतो. हे वैश्विक देणं भारताची मान जगासमोर अभिमानाने उंचावणारे आहे.

■ निसर्ग आणि मानवी मूल्यांचा संगम:-

■ डॉ.बाबासाहेबांनी ज्या धम्माचा स्वीकार केला, तो निसर्ग आणि मानवी मूल्यांचा परिपाक होता. त्यांनी माणसाला निसर्गाशी आणि स्वतःच्या विवेकाशी जोडले. त्यांचे देणं म्हणजे केवळ कायदेशीर हक्क नाहीत, तर ते एक 'जीवन जगण्याची कला' (Way of Life) आहे. ज्यामध्ये करुणा, प्रज्ञा आणि मैत्री यांचा त्रिवेणी संगम आहे. या विचारांनी माणसाला क्रूरतेपासून करुणेकडे नेले, हीच त्यांची खरी सामाजिक किमया आहे.

■ वैचारिक वारसा आणि नवी पिढी:-

■ आज विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं देणं कोणत्या स्वरूपात आपल्यासमोर आहे? ते आहे—विज्ञानावर आधारित दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि अखंड राष्ट्रप्रेम. त्यांनी आपल्याला शिकवले की, "राष्ट्र हे केवळ भूभाग नसून तो एक मानसिक आणि भावनिक अनुबंध आहे." आजची पिढी जेव्हा तंत्रज्ञानाच्या युगात आपली ओळख शोधत आहे, तेव्हा डॉ.बाबासाहेबांचे विचार त्यांना स्थिर राहण्यासाठी नैतिक बळ देतात. त्यांनी दिलेली ही 'वैचारिक शिदोरी' कधीही न संपणारी आणि काळाच्या ओघात अधिक झळाळून निघणारी आहे.

■ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला काय दिले? त्यांनी आपल्याला 'जगण्याचे प्रयोजन'दिले. त्यांनी दिलेले विचार हे केवळ भूतकाळातील गौरवशाली पाने नाहीत, तर ते भविष्यातील प्रत्येक संकटावर मात करणारे 'दीपस्तंभ' आहेत. जेव्हा एखादा वंचित मुलगा पुस्तक हातात घेऊन जागतिक स्पर्धेत उतरतो, जेव्हा एखादी स्त्री स्वतःच्या हक्कासाठी खंबीरपणे उभी राहते आणि जेव्हा लोकशाही धोक्यात असताना सामान्य नागरिक संविधानाचा आधार घेतो; तेव्हा खऱ्या अर्थाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या 'लाख मोलाच्या देण्याची' प्रचिती येते. त्यांनी दिलेली ही विचारांची शिदोरी कधीही न संपणारी आहे. ते केवळ एका युगाचे नायक नव्हते, तर ते मानवतेच्या अंतापर्यंत मार्ग दाखवणारे 'विश्ववंद्य' महामानव आहेत!

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका काळाचे नायक नव्हते, तर ते युगपरिवर्तक होते. त्यांचे 'लाख मोलाचे देणं' हे केवळ इतिहासाच्या पुस्तकात बंदिस्त नाही, तर ते रोजच्या संघर्षात, मिळणाऱ्या न्यायात आणि जपल्या जाणाऱ्या स्वाभिमानात जिवंत आहे. त्यांनी आपल्याला फक्त हक्क दिले नाहीत, तर त्या हक्कांचे रक्षण करण्याची 'धमक' दिली. त्यांनी आपल्याला फक्त कागदावरचे कायदे दिले नाहीत, तर त्या कायद्यांना जगण्याची 'शक्ती' दिली. आज जेव्हा आपण स्वातंत्र्याचा मुक्त श्वास घेतो, तेव्हा त्या प्रत्येक श्वासात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्यागाचे आणि परिश्रमाचे सुगंध दरवळत असतात. शेवटी, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं देणं म्हणजे— महापरिनिर्वाणा नंतर समाजाच्या जाणीवेत जिवंत राहणारा एक ज्वलंत विचार! जोपर्यंत आभाळाचा निळा रंग कायम आहे, तोपर्यंत या महामानवाचे हे 'लाख मोलाचे देणं' मानवाच्या कल्याणासाठी दीपस्तंभासारखे तळपत राहील.



■ प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे, नाट्यशास्त्र विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी , जि. जालना संवाद:9823836675

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली



# सुनील राणे व शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत आज परळीत मतदारयादी पुनर्विलोकन मार्गदर्शन बैठक





## लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे - प्रा. पवन मुंडे

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी विधानसभा करिता सखोल मतदार यादी पुनरावलोकन (SIR) मार्गदर्शन बैठक उद्या 14 एप्रिल रोजी भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत परळीत आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या बैठकीस लोकप्रतिनिधी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एसआयआर बी.एल.ए. - 1 विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

मंगळवार दि. 14 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता अक्षता मंगल कार्यालय येथे होणाऱ्या या महत्वपूर्ण बैठकीस मार्गदर्शन करण्यासाठी भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख उपस्थित राहणार आहेत. सखोल मतदार यादी पुनरावलोकन यावर मान्यवर सविस्तर मार्गदर्शन व शंका निरसन करणार आहेत. तरी या बैठकीला मतदार संघातील सर्व शहर व ग्रामीण मंडळ अधिकारी, नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पक्षाचे सुपर वोरिअर्स, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख शहर, तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन एसआयआर बी.एल.ए. - 1 विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

# देशाला नेत्यांची नाही तर कार्यकर्त्यांची गरज अ‍ॅड. अजित देशमुख यांचे प्रतिपादन

**बीड |प्रतिनिधी**

सामाजिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या झपाट्याने कमी होत चालली आहे. स्वराज्य जनजागृती परिषदेच्या माध्यमातून ही संख्या आपल्याला वाढवायची आहे. सध्याची परिस्थिती पाहता "देशाला नेत्यांची नाही तर कार्यकर्त्यांची गरज आहे". त्यामुळे चांगल्या कार्यकर्त्यांचे संघटन करून स्वराज्य जनजागृती परिषद मजबूत करा, असे आवाहन स्वराज्य जनजागृती परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड, अजित एम. देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी स्वराज्य जनजागृती परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी गायकवाड हे होते. यावेळी जिल्हाभरातून सर्वच तालुक्यातील कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अ‍ॅड. देशमुख पुढे म्हणाले की, सामाजिक चळवळी जिवंत राहिल्या पाहिजेत. कार्यकर्त्याचा सरकारवर अंकुश असला पाहिजे. त्याचबरोबर कार्यकर्त्यांनी प्रशिक्षित झाले पाहिजे. त्यामुळे आपल्याला प्रशिक्षण शिबिरे देखील मोठ्या प्रमाणात आयोजित करावयाची आहेत.

स्वराज्य जनजागृती परिषद ही "व्यक्तीला नव्हे तर व्यवस्थेला विरोध" या तत्त्वावर आधारित काम करत आहे. त्याचबरोबर भ्रष्ट व्यवस्थेमध्ये सुधारणा व्हावी, या दृष्टीने देखील परिषद काम करत आहे.

सामाजिक काम फक्त आंदोलन करून होत नाही, तर त्याला व्यवस्था परिवर्तनाची जोड असली पाहिजे. त्यामुळे अभ्यासू कार्यकर्ता व्यवस्थेचा परिवर्तन करू



शकतो. कार्यकर्त्यांना काम करण्यासाठी खूप मोठा वाव आहे. त्यामुळे त्यांनी अभ्यास पूर्ण रितीने कामाला लागावे. समाज घडवण्यासाठी आता झटले पाहिजे.

देशमुख यांनी कार्यकर्त्यांनी पाळावयाची आचारसंहिता त्यांना समजावून सांगितली. त्याचबरोबर निस्पृहपणे काम करणारे चारित्रसंपन्न कार्यकर्ते आपण जोडावेत, त्यांना परिषदेचे उद्दीष्ट समजावून सांगून कामात जोडून घ्या, असेही ते म्हणाले.

युवक, शेतकरी, आरोग्य, शिक्षण, अशा मुद्द्यांवर कार्यकर्त्यांनी एकमेकांशी संवाद साधून मोठ्या प्रमाणात काम केले पाहिजे. कार्यकर्त्यांमधील आपसातला संवाद चळवळीला बळ देत असतो. त्यामुळे कार्यकर्त्यांनी एकमेकांशी आणि समाजाशी सातत्याने संवाद साधून काम करावे, असे आवाहन अ‍ॅड. देशमुख यांनी या वेळी केले.

यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केले. यात प्रामुख्याने कादर मकरानी (पाटोदा), विजयकुमार गाडेकर, थोरात बापू (शिरूर कासार), प्रा. अजित इथापे (आष्टी), नारायण बापमारे, राजेंद्र तोर (माजलगाव), भागवत ढोरमारे, विशाल पांढरे (गेवराई), धनंजय सोळंके, रवींद्र मुंडे (परळी), अ‍ॅड. सुभाष शिंदे, मदनराव मस्के, वाघमारे सर (अंबेजोगाई), तुषार पाटील, गोवर्धन मस्के, नवनाथ नाईकवाडे, (बीड), शामसुंदर थोटे (वडवणी), जालिंदर देशमुख (केज), संदीपान थोरात, संतोष थोरात (धारूर) यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेतकरी गट व वराह पालनाचा समावेश

## - पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची माहिती



**मुंबई :** राज्यात पशुधनावर आधारित उद्योजकता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेत आता मुरघास संयंत्र वाटप योजनेत शेतकरी समूह गटाचा तसेच वराह पालन व्यवसायाचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

पशुसंवर्धन विभागाने यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध केला. या निर्णयामुळे मुरघास संयंत्रांच्या माध्यमातून वैरण विकासाला चालना मिळणार असून पशुपालकांसाठी स्थिर व परवडणारा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. विशेषतः समूह पातळीवर काम केल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण भागात उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.


या निर्णयानुसार आता वैयक्तिक लाभार्थ्यांबरोबरच शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी समूह गट, महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदणीकृत असलेली समुदाय आधारित संसाधन केंद्रे आणि उमेद नोंदणीकृत प्रभाग संघ यांनाही या योजनेत सहभागी होता येणार आहे. यासाठी संबंधित संस्थांकडे किमान ५० सदस्य, ५ लाख रुपये भागभांडवल आणि मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण पूर्ण असणे आवश्यक ठेवण्यात आले आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन यांचा समावेश आहे. आता या निर्णयानुसार वराह पालनाला चालना देण्यासाठी 'वराह पालन गट वाटप योजना' समाविष्ट करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ५+१ वराह गट, विमा आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा समावेश असलेला सुमारे २.०८ लाख रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सर्वसाधारण लाभार्थ्यांना ५० टक्के तर अनुसूचित जाती-जमातींना ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेत सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील भूमिहीन, अल्पभूधारक, महिला बचत गट आणि सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यात येणार असून महिलांसाठी ५० टक्के तर दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण लागू राहणार आहे. लाभार्थ्यांना पशुपालनाचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात आले असून स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली खरेदी प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

उद्योजकता विकास योजनेअंतर्गत ४ टक्के व्याज सवलत योजना ही शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन या पशुपालन व्यवसायाबरोबरच वराह पालन व्यवसायालाही लागू करण्यात आली आहे. यामुळे पशुपालन क्षेत्रात गुंतवणूक वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

# दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री पापदंडेश्वराचा पालखी सोहळा आज



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री पापदंडेश्वराचा पालखी सोहळा मंगळवारी (दि.१४) मध्यरात्री १२ वाजता सुरू होणार असून बुधवारी (दि.१५) दुपारी १ वाजता महाआरतीने संपन्न होणार आहे. या पालखी सोहळ्यात प्रसिद्ध भारूडकार, सोंगे, गवळणींच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील पिंपळगाव गाडे येथील श्री क्षेत्र पापंडेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन बुधवार (ता.०८) ते बुधवार (ता.१५) करण्यात आले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाची मंगळवारी काल्याच्या किर्तनाने समारोप होणार असून सायंकाळी मध्यरात्री १२ वाजता फटाक्यांच्या आतिषबाजीत पालखी सोहळ्यास सुरुवात होणार आहे. या पालखी सोहळ्यात प्रसिध्द भारुडाकारांचा भारुडांचा कार्यक्रम व बुधवारी सकाळी गवळणी व प्रबोधनपर सोगांचा कार्यक्रम होणार आहे. हा पालखी सोहळा दोन दिवस चालतो. बुधवारी दुपारी एक वाजता महाआरती तद्नंतर महाप्रसादाचे पालखी सोहळ्याची सांगता होणार आहे. या सोहळ्यात पंचक्रोशीतील शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# मराठवाडा विभागात शेकापक्ष विस्ताराची जबाबदारी आता केजचे भाई मोहन गुंड यांच्या खाद्यावर

## अनेक वर्षे चळवळीचा अनुभव प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक चेहरा शेकापने दिला

**प्रतिनिधी | केज**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा मराठवाडा एकेकाळी बालेकिल्ला होता. मराठवाड्याने शेकापला दिग्गज नेते दिले यामध्ये उस्मानाबादचे विरोधी पक्ष नेते, खासदार स्वातंत्र्य सैनानी भाई उध्दवराव पाटील, माजी खासदार भाई अ‍ॅड. नरसिंगराव काटीकर, परभणीचे आमदार भाई अण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे माजी खासदार, आमदार भाई डॉ. केशवराव धोंडगे, अहमदपूरचे माजी मंत्री किसनराव देशमुख, परभणीचे माजी खासदार शेषराव देशमुख, तुळजापूरचे माजी आमदार मानिकराव खपले, परभणीचे भाई लक्ष्मणराव नाना गोळेगावकर, कळंबचे माजी आमदार कुंडलिकराव घोडके , निलंग्याचे माजी आमदार भाई श्रीपतराव साळुंके,औसाचे माजी आमदार भाई मल्लनाथ गुंडनाथआप्पा, कंधारचे माजी आमदार गुरुनाथ कोरडे, गंगाखेडचे माजी आमदार भाई ज्ञानोबा गायकवाड,बीडचे जनार्दन तुपे, परतुरचे भाई माजी बारकुले या नेत्त्यांसह शेकडोवर आक्रमक झुंजार कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर काम करणारी शेकापची मोठी फळी मराठवाड्यामध्ये होती. अलीकडच्या काळात भांडवली, जातीय गलिच्छ राजकिय समीकरणात चळवळीपासुन तरूण दुरावत गेले, पक्षाचे मराठवाड्यात बोटावर मोजण्याइतकेच



**मे मध्ये मराठवाड्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे, पूर्ण विभागामध्ये तालुका दौरे करून जुन्या नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून प्रत्येक तालुक्यामध्ये कमिटी स्थापन करून, शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता प्रत्येक तालुक्यात मराठवाड्यामध्ये शेकापचे कार्यकर्ते अग्रही भूमिका घेऊन प्रश्न सोडवण्यासाठी काम करतील या साठी मी स्वतः लक्ष घालणार आहे प्रत्येक गावात गावात शेकापचे विचार पोहचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले आहेत. मो 9423979492**

लोक पक्षात उरले आहेत. आशा परिस्थितीत प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक आंदोलनातील चेहरा म्हणून ओळख असणारे शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांच्यावर दौरे करुन बांधणीची जबाबदारी देण्यात आल्यामुळे मराठवाड्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

मराठवाडा विभागातील पक्ष संघटन बांधणीसाठी पुर्ण वेळ काम करणारे भाई मोहन गुंड यांच्यावर जबाबदारी द्यावी अशी मागणी अनेक कार्यकर्त्यांची होती, त्या अनुषंगाने पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार भाई जयंत पाटील यांच्या आदेशान्वये मराठवाडा विभागाची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई अ‍ॅड.राजेंद्र कोरडे यांनी या संदर्भातील पत्र भाई मोहन गुंड यांना दिले आहे. या पत्रानुसार मराठवाडा विभागात पक्षाचा दौरा आयोजित करून ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर पक्ष संघटन करणे अपेक्षित आहे, पक्ष विस्तारासाठी समित्यांची स्थापना करणे, पदाधिकाऱ्यांची निवड करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी जनसंघटना आघाड्याची स्थापना करून त्यावर पदाधिकारी नेमण्याचे अधिकार ही भाई मोहन गुंड यांना देण्यात आले आहेत. केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयात पाठवण्याच्या सूचना ही देण्यात आल्या आहेत. या निवडीमुळे मराठवाड्यात शेतकरी कामगारांच्या प्रश्नांवर शेकाप अधिक आक्रमकपणे काम करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. भाई मोहन गुंड हे चिटणीस मंडळाचे सदस्य असून अत्यांत चिकाटीने जिद्दीने प्रमाणीकपणे काम करणारा चेहरा म्हणुन त्याची मराठवाड्यात ओळख आहे. अनेक शेतकरी कामगाराचे यशस्वी आंदोलने त्यांच्या नावावर आहेत, सक्रीय चळवळीतील अनुभवाचा फायदा पक्ष कार्यकर्त्यांना होईल असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. मराठवाडा विभागासह राज्यभरातून भाई मोहन गुंड यांचं अभिनंदन करण्यात येत आहे, मात्र पुन्हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये उभा करणे हे त्यांच्या समोरील मोठं आव्हान असणार आहे हे मात्र नक्की.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार 14 एप्रिल 2026


## दिव्यांग बांधवांसाठी आनंदाची बातमी!

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. संतोष मुंडे घेऊन आले आहेत 'मोफत नोंदणी शिबीर'

### दिव्यांग बांधवांनो, पंधरा हजारांचे साहित्य हवेय? मग 'या' नोंदणीशिवाय पर्याय नाही



**दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी परळीत 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल' नोंदणी मोहिमेला सुरुवात झाली आहे. आ. धनंजय मुंडे आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे विशेष शिबीर राबवले जात आहे.**

**परळी वैजनाथः (प्रतिनिधी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून परळीत दिव्यांग बांधवांसाठी अत्यंत महत्त्वाचे 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल' मोफत नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या पुढाकाराने हे शिबीर श्रीनाथ हॉस्पिटल, परळी येथे १४ एप्रिल ते २१ एप्रिल या कालावधीत सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

या शिबिराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या दिव्यांग नागरिकांची या पोर्टलवर नोंदणी होईल, त्यांनाच भविष्यात मिळणाऱ्या १५ हजार रुपये किमतीच्या साहित्य वाटपाचा आणि इतर विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे परिसरातील एकाही दिव्यांग बांधवाने या संधीपासून वंचित राहू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे शिबीर राज्याचे माजी कृषिमंत्री आ. धनंजय मुंडे, मा. ना. पंकजाताई मुंडे आणि दिव्यांग कल्याण मंत्री ना. अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे. दिव्यांगांचे कैवारी म्हणून ओळखले जाणारे डॉ. संतोष मुंडे यांनी नेहमीच दिव्यांगांच्या हक्कासाठी लढा दिला असून, या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांगांना आर्थिक आणि सामाजिक आधार देण्याचा त्यांचा संकल्प आहे.

या शिबिरात सहभागी होण्यासाठी दिव्यांगांनी आपले आवश्यक कागदपत्रे घेऊन सकाळी १० ते १ या वेळेत श्रीनाथ हॉस्पिटल, परळी वैजनाथ येथे उपस्थित राहावे आणि आपली नोंदणी निश्चित करावी, असे आवाहन मुख्य आयोजक डॉ. संतोष मुंडे यांनी केले आहे.

## दोन वर्षात शंभर टक्के शेत रस्ते पक्के होणार

# शिबिरातून प्रत्येकाचे समाधान झाले पाहिजे आ. रमेशअप्पा कराड यांचे प्रतिपादन

**लातूर | प्रतिनिधी**



राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यात प्रत्येक मंडळात २५ किलोमीटर रस्त्याचे काम हाती घेतले घेतले जाणार असून येत्या दोन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातला एकही शिव रस्ता शिल्लक राहणार नाही सर्व रस्ते मजबूत होतील असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातील समाधान शिबिरात येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे समाधानाच झाले पाहिजे अडीअडचणी, तक्रारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते सोमवारी झाले. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्या सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, जिप सदस्य महादेव साळुंके, मंडल अध्यक्ष उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भादा गावचे उपसरपंच बालाजी शिंदे, सहा. गटविकास अधिकारी मनोज राऊत, तालुका कृषी अधिकारी दत्ता हाके, महावितरणचे आर. एम. शेंडे, महिला व बालविकास विभागाच्या मंदाकिनी हिरके, महादेव गुरुशेट्टे, रविंद्र पाटील, देवराव मोहिते, गिरिधर पवार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी अनेक गावचे सरपंच नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या केंद्र आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम सरकारच्या माध्यमातून होत आहे. शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी समाधान शिबिर हा एक त्याचाच भाग आहे. शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे बोलून दाखवले.

समाधान शिबिराचा निश्चितपणे अनेकांना लाभ मिळेल फायदा होईल नागरिकांनी आपल्या तक्रारी अडीअडचणी प्रश्न शिबिरातील संबंधिताकडे मांडावेत दोन दिवसात निकाली निघतील असे सांगून आ. रमेशअप्पा कराड यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्याकडून योजनेच्या अंमलबजावणीची माहिती दिली काही अधिकार्यांनी मोघम उत्तरे दिली असता माझं समाधान करू शकत नाहीत तर जनतेचे कसे समाधान करणार असा प्रश्न उपस्थित करून चुकीची आणि अपुरी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना यापुढे खपवून घेतले जाणार नाही अशी सर्वांसमोर समज दिली.

अतिक्रमीत झालेले सर्व शेतरस्ते सहज खुले झाले तर ठीक नाहीतर कायदेशीर कार्यवाही करून ३० एप्रिल पर्यंत सर्व शेतरस्ते मुक्त करावेत, कबाल्या अभावी घरकुल मिळत नसलेल्या नागरिकांना शासनाच्या नियमानुसार जागा देऊन घरकुलाचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करावे, शासनाच्या धान्य वाटप यंत्रणेत होणारा काळाबाजार तात्काळ थांबवावा, महावितरणने शेतकऱ्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना आ. रमेशअप्पा कराड यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केल्या.

प्रारंभी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली. शिबिर परिसरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलला भेट देऊन आ. कराड यांनी समाधान व्यक्त केले. शेवटी पद्माकर चिंचोलकर यांनी आभार मानले. या समाधान शिबिरात संगायो लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, ट्रॅक्टर वाटप, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भादा महसूल मंडळात असलेल्या २६ गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी १७ एप्रिलला बीडमध्ये मोर्चा; खासदार बजरंग सोनवणे यांचा जाहीर पाठिंबा

**बीड (प्रतिनिधी)**



महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात न्याय्य हक्क मिळावेत या प्रमुख मागणीसाठी बीड येथे दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी भव्य मुस्लिम आरक्षण मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला बजरंग मनोहर सोनवणे यांनी जाहीर पाठिंबा दर्शविल्याने आंदोलनाला मोठे बळ मिळाले आहे.

याबाबत सकल मुस्लिम आरक्षण कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलेल्या अधिकृत पत्रात सोनवणे यांनी मुस्लिम समाजाच्या मागण्यांना पाठिंबा देत स्पष्ट भूमिका मांडली आहे. मुस्लिम समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षण अत्यंत आवश्यक असून, ही मागणी सामाजिक न्यायाच्या दृष्टीने योग्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

पत्रात पुढे त्यांनी म्हटले आहे की, राज्यातील अनेक मागास व वंचित घटकांप्रमाणेच मुस्लिम समाजालाही समान संधी उपलब्ध करून देणे ही शासनाची नैतिक व घटनात्मक जबाबदारी आहे. शिक्षण, रोजगार व आर्थिक उन्नती या क्षेत्रात मुस्लिम समाज मागे राहिल्याचे वास्तव लक्षात घेता, शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, बीडमध्ये आयोजित करण्यात येणारा हा मोर्चा लोकशाही मार्गाने, शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या मोर्चामध्ये राज्यभरातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक यांचा देखील या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे.

या मोर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून घेऊन मुस्लिम आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आंदोलनामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता असून, आगामी काळात या विषयावर राजकीय पातळीवरही हालचाली वेग घेण्याची चिन्हे आहेत.

खासदार सोनवणे यांनी आपल्या पत्रात या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देत, मोर्चा यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. तसेच लोकशाही पद्धतीने मांडल्या जाणाऱ्या या मागण्यांची शासनाने दखल घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे

